महाराष्ट्र शासन - सार्वजनिक आरोग्य विभाग

राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,

डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

| | | |
|---|---|---|
| डॉ.मधुकर .शे.पवार<br>उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजिआ)<br>तथा उपमुख्य निबंधक<br>(जन्म व मृत्यु) महाराष्ट्र राज्य | | कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०<br>मा.सं. विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०<br>फॅक्स क्र. :- ०२० - २६०५८२९२<br>ई-मेल crs_d83@yahoo.com |


**परिपत्रक** क्रं.१०                जा.क्र.आमाजिआ/कक्ष-८ ३/मार्गदर्शन/5466-5533/१५

दिनांकः- 11/6 /२०१५

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु
जिल्हा परिषद ........... (सर्व)

२) आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु
महानगरपालिका ............ (सर्व)

३) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु,
बृहन्मुंबई महानगरपालिका, परेल, मुंबई.

४) कार्यकारी अधिकारी तथा निबंधक, जन्म-मृत्यु,
कॅन्टोनमेंट बोर्ड............ (सर्व)

विषय :- दत्तक घेतलेल्या बालकांच्या जन्म अहवालामध्ये जन्म नोंद घेणे/बदल करण्याबाबत मार्गदर्शन.

संदर्भ :- भारत सरकारचे उपनिबंधक जनरल (सीआरएस) यांचे पत्र No.1/7/2011-VS-CRS/935, dated 15th May 2015.

उपरोक्त विषयाबाबत या कार्यालयाचे दिनांक ५ सप्टेंबर २०१४ व केंद्र शासनाचे दिनांक २५/०८/२०१४ च्या परिपत्रकाचे अवलोकन करावे.

संस्थे व्यतिरिक्त इतर दत्तक घेतलेल्या प्रकरणामध्ये केंद्र शासनास या अनुषंगाने दत्तक विधान (Adoption deed) व दत्तक आदेश (Adoption Order) सादर करताना अनेक त्रुटी (Quaries) प्राप्त झाल्या आहेत. अशा बाबतीत संस्थे व्यतिरिक्त दत्तक घेतलेली प्रकरणे ही हिंदू अडप्शान व मेंटेनन्स ॲक्ट १९५६ 'Hindu adoption and Maintenance' (HAMA) कायदा (Act) १९५६ व कलम १६ अन्वये दत्तक विधान केले जाते. दत्तक विधान करण्यासाठी कोणत्याही कायदयाखाली ज्याच्यावर दोन्ही बाजूच्या (दत्तक देणारे व घेणारे यांच्या) सहया असणारे नोंदविलेले

कागदपत्रे (दत्तक विधान) पुरेसे आहे. या बाबतीत दत्तक विधानाच्या खरेपणा बाबतची खात्री करण्यासाठी 'HAMA' कायदयामध्ये केलेल्या तरतूदी प्रमाणे तपासून पाहणे.

दत्तक आदेश प्राप्त करुन घेण्यासाठी नातेवाईक व सामान्य नागरीकांना येणा-या अडचणीं बाबत केंद्र स्तरावर आढावा घेण्यात आला व त्याबाबत महिला व बाल विकास विभाग मंत्रालयाच्या Central Adoption Resource Authority (CARA) यांचेशी झालेल्या चर्चेनुसार घेण्यात आलेल्या निर्णया प्रमाणे देशात संस्थे व्यतिरिक्त नातेवाईक किंवा इतर ओळखीच्या संबंधामध्ये होणा-या दत्तक प्रक्रियेमध्ये यांच्या दत्तक नोंदणीसाठी 'नोंदणीकृत दत्तक विधान' पुरेसे आहे. अशा प्रकरणामध्ये न्यायालयीन दत्तक आदेश देण्याची आवश्यकता नाही.

अर्थात जन्म नोंदणी अहवालामध्ये जन्म नोंद घेणे/बदल करताना निबंधक जन्म-मृत्यू यांनी 'दत्तक विधान' बरोबर असल्याचे तपासून 'दत्तक विधान' राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या उपनिबंधकाकडे नोंदविले असल्याची खात्री करावी. त्या नंतर आवश्यक ते बदल दत्तक विधानात दिलेल्या माहितीच्या आधारे जन्म अहवालात दत्तक आई-वडीलांचे व बालकाच्या नावाची नोंद घेऊन जन्म प्रमाणपत्र वितरीत करावे.

संस्थे बाहेरील इतर दत्तक प्रकरणीं दत्तक बालक व पालकाचे नांव नोंदविण्यास जर एक वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला असेल व त्यांची नोंद जन्म नोंदवहीत आढळली नसल्यास अशा बाबतीत जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम (१३)(३) नुसार उशिरा नोंदणीची प्रक्रिया अवलंबून वर्ग-१ न्याय दंडाधिकारी यांचे आदेश प्राप्त करुन घ्यावेत व त्यानंतर संबंधित घटनेची नोंद जन्म अहवालात घेण्यात यावी.

वर नमूद केलेली वस्तूस्थिती विचारात घेऊन तसेच दत्तक बालकांच्या पालकांना व नागरीकांना जन्म प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. यास्तव आपणास विनंती करण्यात येते की, दत्तक घेतलेल्या बालकांचे जन्म प्रमाणपत्र प्राधान्याने वितरीत

करण्यात यावे आणि दत्तक बालकाच्या पालकांनी कागदपत्रे सादर केल्यानंतर संबंधीत निबंधक जन्म-मृत्यू यांनी ७ ते १० दिवसात दत्तक बालकाचे जन्म प्रमाणपत्र वितरीत करावे.

याबाबतच्या सूचना आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व निबंधक जन्म-मृत्यू यांना निर्गमित कराव्यात व त्वरित अंमलबजावणी करणेबाबत आदेशित करावे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. सोबत संदर्भिय केंद्र शासनाचे दिनांक १५/०५/२०१५ च्या पत्राची प्रत जोडली आहे.

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत सविनय सादर -
1) Dy.Registrar General (CRS), Government of India,
Ministry of Home Affairs, V.S.Division, West Block-1,
R.K.Puram, New Delhi-110066.

२) मा. संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म-मृत्यु, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी -
उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे ............. (सर्व)

उपसंचालक
आरोग्य सेवा (आ.मा.जी.आ.)
पुणे
दिनांक 1 1 JUN 2015
जावक क्र. ......
सही ......